# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र. आरक्षण/ओ-२२/१६०६

दिनांक : १९ ऑगस्ट, २०१३

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील
सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

**विषय : शिक्षक व शिक्षकेतर पदांच्या बिंदूनामावली नोंदवही नवीन नमुन्यात तयार करणे व अद्ययावत ठेवणे याबाबत मार्गदर्शन शिबीर/कार्यशाळेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, शासनाने बिंदूनामावली नोंदवही नमुन्यामध्ये बदल सुचविलेला असल्याने महाविद्यालये /संस्था यांना नवीन बिंदूनामावली तयार करताना ब-याचशा अडचणी येत आहेत. याबाबत मा.सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, नाशिक विभाग यांचे मार्गदर्शन घेण्याकरिता नाशिक आणि अहमदनगर जिल्हयातील महाविद्यालयांकरिता शिबीर/कार्यशाळा खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेले आहे. :-

| अ.क्र | ठिकाण | दिनांक व वेळ | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | न्यु आर्टस कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर-४१४ ००१. | शुक्रवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता | अहमदनगर जिल्हयातील अनुदानित/ विना अनुदानित, कायम विना अनुदानित महाविद्यालय / संस्था |
| २ | मराठा विद्याप्रसारक समाज नाशिक, रावसाहेब थोरात सभागृह, नाशिक - ४२२ ००२. | शनिवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता | नाशिक जिल्हयातील अनुदानित/ विना अनुदानित, कायम विना अनुदानित महाविद्यालय / संस्था |

मागासवर्गीयांच्या आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र शासनाने निर्गमीत केलेले महत्वाचे शासन निर्णय व परिपत्रके सोबत जोडलेली आहेत. तरी आपल्या महाविद्यालयामध्ये बिंदूनामावली अद्ययावत ठेवण्यासंदर्भातील काम पहात असलेल्या दोन सेवकांस उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी व वेळी आवश्यक त्या कागदपत्रांसह महाविद्यालयाच्या खर्चाने शिबीरास/कार्यशाळेस उपस्थित राहण्यासंदर्भात योग्य त्या सूचना द्याव्यात, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

19/8/13


उपकुलसचिव
( आरक्षण कक्ष )

सोबत:- वरीलप्रमाणे

G:\pk 2013\Circulars.docx

# पुणे विद्यापीठ

## मागासवर्गीयांच्या आरक्षणा संदर्भात महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रके



## बिंदुनामावली नोंदवही नविन नमुन्यात तयार करणे व अद्ययावत ठेवणे याबाबत मार्गदर्शन शिबिर / कार्यशाळा

---


**आरक्षण कक्ष**

पुणे विद्यापीठ

पुणे - ४११ ००७.

दुरध्वनी क्र. ०२०-२५६०११९०

arakshan_ar@unipune.ac.in

## आरक्षणासंदर्भातील महत्वाचे शासन निर्णय

| अ.क्र. | शासन निर्णय क्रमांक | दिनांक | संक्षिप्त विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब | २९/०३/१९९७ | सरळसेवा प्रवेश व पदोन्नतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करण्याबाबत. | १ |
| २. | बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब | १८/१०/१९९७ | आर.के. सभरवाल आणि इतर विरूध्द पंजाब राज्य प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने आरक्षणाबाबतचे आदेश | ५ |
| ३. | एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ | १६/०३/१९९९ | शासन सेवेत सरळ सेवा भरतीसाठी समांतर आरक्षण (Horizontal Reservation) कार्यन्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करण्याबाबत. | ९ |
| ४. | बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब | २५/०५/२००४ | पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागु करण्याबाबत. | ११ |
| ५. | बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब | ०५/११/२००९ | अनुसूचित जाती कल्याण समिती व विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समितीने बिंदुनामावली व आरक्षणाची पदे भरण्याबाबत केलेल्या सुचनांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत. | १५ |
| ६. | बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब | १२/१२/२०११ | शासन परिपत्रक दि.०५/११/२००९ मधील क्रमांक ७ च्या आदेशास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने सुधारित आदेश निर्गमीत करण्याबाबत. | २७ |
| ७. | बीसीसी-२०१२/प्र.क्र. ३३२/१२/१६-ब | १८/०५/२०१३ | मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचा-यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती. | ३१ |
| ८. | --- | --- | मा.सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, पुणे यांचे नामावली नोंदवही पडताळणीच्यावेळी कोणती कागदपत्रे आणावीत याबाबतचे पत्र. | ४१ |

सरळसेवा प्रवेश व पदोन्नतीसाठी सुधारित बिंदू नामावली विहित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन निर्णय, क्रमांक-बीसीसी-1097/प्र. क्र. 2/97/16-ब,**
**मंत्रालय, मुंबई 400 032. दिनांक : 29 मार्च 1997.**

वाचा :—(1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-1094/प्र.क्र. 68/94/16-ब, दिनांक 26 जुलै, 1995.
(2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-1094/3609/प्र.क्र. 56/94/16-ब, दिनांक 15 सप्टेंबर, 1995.
(3) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-1094/3609/प्र.क्र. 56/94/16-ब, दिनांक 15 फेब्रुवारी, 1996.

प्रस्तावना :—उपरोक्त दिनांक 26 जुलै, 1995 व दिनांक 15 सप्टेंबर, 1995 च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या 200 बिंदू व 50 बिंदू नामावल्या मागे घेण्यात येत असल्याची घोषणा, दिनांक 19 डिसेंबर, 1995 रोजी विधान परिषदेत झालेल्या चर्चेच्यावेळी शासनातर्फे करण्यात आली. त्या अनुषंगाने, उपरोक्त क्रमांक-3 येथील दिनांक 15 फेब्रुवारी, 1996 च्या शासन निर्णयान्वये, घोषणेच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक 19 डिसेंबर, 1995 पासून, 200 बिंदू व 50 बिंदू नामावल्या मागे घेण्यात आल्या. मात्र दरम्यानच्या काळात कामाकाजाची अडचण होऊ नये म्हणून तात्पुरती 200 बिंदू/50 बिंदू नामावली विहित करण्यात आली. बिंदू नाभावली सुधारित करण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता.

शासन निर्णय :—सरळसेवा प्रवेशासाठी व पदोन्नतीसाठी बिंदू नामावल्या सुधारित करण्याच्या प्रश्नासंदर्भात शासनाने मा. उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली होती. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार सरळसेवा प्रवेशासाठी सुधारित 100 बिंदू नामावली व पदोन्नतीसाठी सुधारित 50 बिंदू नामावली याद्वारे विहित करण्यात येत आहेत. सुधारित बिंदू नामावलीचा नमुना सोबत जोडला आहे.

2. या निर्णयाच्या दिनांकापूर्वी ज्या प्रकरणी कार्यवाही पूर्ण झालेली आहे, त्याचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही. मात्र, यापुढे सरळसेवा भरती व पदोन्नतीसंदर्भात, सोबतची सुधारित बिंदू नामावली अनुसरण्यात यावी. विद्यमान बिंदू नामावलीनुसार यापूर्वी ज्या क्रमांकापर्यंतचे बिंदू वापरले आहेत, त्यापुढील बिंदूपासून सुधारित बिंदू नामावलीचा अवलंब करण्यात यावा. मात्र त्यापूर्वीचा अनुशेष असल्यास सरळसेवा भरती/पदोन्नती प्रसंगी विचारात घेण्यात यावा. विमुक्त जाती/भटक्या जमातीकरिता सरळ सेवेसाठी "अ", "ब", "क" व "ड" या प्रवर्गातील आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय (Internally transferable) राहील.

3. मंत्रालयीन विभागांनी, सरळसेवा भरती व पदोन्नतीच्यावेळी, या सुधारित बिंदू नामावलीचा अवलंब करावा. तसेच त्यांच्या नियंत्रणाखाली सर्व शासकीय कार्यालयांना, या संदर्भात उचित सूचना देण्यात याव्यात. निमशासकीय सेवा, मंडळे, महामंडळे इत्यादीमध्ये, हे आदेश लागू करण्यासंबंधी संबंधित मंत्रालयीन विभागांनी योग्य ते आदेश निर्गमित करावेत.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रवि भू. बुद्धीराजा,
सचिव (सेवा).

प्रति,
राज्यपालांचे सचिव,

**पुणे विद्यापीठ, पुणे-7.**

संदर्भ क्र. आरक्षण/४२/४३८

आरक्षण कक्ष
दि. ७-७-१९९७

(1) मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.
(2) मा. विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ,

महोदय,
वरील शासन निर्णय आपणाकडे माहितीसाठी आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे.
कळावे,

आपला विश्वासू,
सही/—
उप-कुलसचिव
(आरक्षण)

[कृपया मागे पहावे

## सरळसेवा भरतीसाठी 100 बिंदू नामावली

| अनुक्रमांक | वर्ग | अनुक्रमांक | वर्ग |
|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित, जाती | 51. | अनुसूचित जाती |
| 2. | अनुसूचित जमाती | 52. | खुला |
| 3. | विमुक्त जाती (अ) | 53. | अनुसूचित जमाती |
| 4. | भटक्या जमाती (ब) | 54. | खुला |
| 5. | इतर मागास वर्ग. | 55. | इतर मागास वर्ग |
| 6. | खुला | 56. | खुला |
| 7. | भटक्या जमाती (क) | 57. | भटक्या जमाती (क) |
| 8. | खुला | 58. | खुला |
| 9. | इतर मागास वर्ग | 59. | इतर मागास वर्ग |
| 10. | खुला | 60. | खुला |
| 11. | भटक्या जमाती (ड) | 61. | अनुसूचित जाती |
| 12. | अनुसूचित जाती | 62. | खुला |
| 13. | खुला | 63. | अनुसूचित जमाती |
| 14. | खुला | 64. | खुला |
| 15. | विशेष मागास वर्ग | 65. | इतर मागास वर्ग |
| 16. | खुला | 66. | खुला |
| 17. | इतर मागास वर्ग | 67. | अनुसूचित जाती |
| 18. | खुला | 68. | खुला |
| 19. | इतर मागास वर्ग | 69. | इतर मागास वर्ग |
| 20. | खुला | 70. | खुला |
| 21. | अनुसूचित जाती | 71. | अनुसूचित जमाती |
| 22. | खुला | 72. | खुला |
| 23. | अनुसूचित जमाती | 73. | अनुसूचित जाती |
| 24. | खुला | 74. | खुला |
| 25. | इतर मागास वर्ग | 75. | इतर मागास वर्ग |
| 26. | खुला | 76. | खुला |
| 27. | अनुसूचित जाती | 77. | भटक्या जमाती (ड) |
| 28. | खुला | 78. | खुला |
| 29. | इतर मागास वर्ग | 79. | इतर मागास वर्ग |
| 30. | खुला | 80. | खुला |
| 31. | भटक्या जमाती (क) | 81. | अनुसूचित जाती |
| 32. | खुला | 82. | खुला |
| 33. | अनुसूचित जमाती | 83. | विमुक्त जाती (अ) |
| 34. | खुला | 84. | खुला |
| 35. | इतर मागास वर्ग | 85. | इतर मागास वर्ग |
| 36. | खुला | 86. | खुला |
| 37. | अनुसूचित जाती | 87. | विशेष मागास वर्ग |
| 38. | खुला | 88. | खुला |
| 39. | इतर मागास वर्ग | 89. | इतर मागास वर्ग |
| 40. | खुला | 90. | खुला |
| 41. | विमुक्त जाती (अ) | 91. | अनुसूचित जाती |
| 42. | खुला | 92. | खुला |
| 43. | अनुसूचित जाती | 93. | अनुसूचित जमाती |
| 44. | खुला | 94. | खुला |
| 45. | इतर मागास वर्ग | 95. | इतर मागास वर्ग |
| 46. | खुला | 96. | खुला |
| 47. | भटक्या जमाती (ब) | 97. | अनुसूचित जाती |
| 48. | खुला | 98. | खुला |
| 49. | इतर मागास वर्ग | 99. | भटक्या जमाती (ब/क) |
| 50. | खुला | 100. | खुला |

## वर्गानुसार आरक्षित पदे

| | वर्गानुसार आरक्षित पदे | | बिंदू | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती (13) | : | 1 | 12 | 21 | 27 | 37 | 43 | 51 |
| | | | 61 | 67 | 73 | 81 | 91 | 97 | |
| 2. | अनुसूचित जमाती (7) | : | 2 | 23 | 33 | 53 | 63 | 71 | 93 |
| 3. | विमुक्त जाती (अ) (3) | : | 3 | 41 | 83 | | | | |
| 4. | भटक्या जमाती (ब) (2.5) | : | 4 | | 47 | } 99 (ब/क) | | | |
| 5. | भटक्या जमाती (क) (3.5) | : | 7 | 31 | 57 | | | | |
| 6. | भटक्या जमाती (ड) (2) | : | 11 | 77 | | | | | |
| 7. | विशेष मागास प्रवर्ग (2) | : | 15 | 87 | | | | | |
| 8. | इतर मागास वर्ग (19) | : | 5 | 9 | 17 | 19 | 25 | 29 | 35 |
| | | | 39 | 45 | 49 | 55 | 59 | 65 | 69 |
| | | | 75 | 79 | 85 | 89 | 95 | | |
| 9. | सर्वसाधारण (48) | : | 6 | 8 | 10 | 13 | 14 | 16 | 18 |
| | | | 20 | 22 | 24 | 26 | 28 | 30 | 32 |
| | | | 34 | 36 | 38 | 40 | 42 | 44 | 46 |
| | | | 48 | 50 | 52 | 54 | 56 | 58 | 60 |
| | | | 62 | 64 | 66 | 68 | 70 | 72 | 74 |
| | | | 76 | 78 | 80 | 82 | 84 | 86 | 88 |
| | | | 90 | 92 | 94 | 96 | 98 | 100 | |

## पदोन्नतीसाठी नमुनेवजा नामावली (५० बिंदू रोस्टर)

| अनुक्रमांक | वर्ग | अनुक्रमांक | वर्ग |
|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती | 26. | खुला |
| 2. | खुला | 27. | खुला |
| 3 | अनुसूचित जमाती | 28. | खुला |
| 4. | खुला | 29. | अनुसूचित जाती |
| 5. | विमुक्त जाती (अ) | 30. | खुला |
| 6. | खुला | 31. | खुला |
| 7. | विशेष मागास प्रवर्ग | 32. | खुला |
| 8. | खुला | 33. | विमुक्त जाती भटक्या जमाती (अ/ब) |
| 9. | अनुसूचित जाती | 34. | खुला |
| 10. | खुला | 35. | खुला |
| 11. | खुला | 36. | खुला |
| 12. | खुला | 37. | अनुसूचित जमाती |
| 13. | अनुसूचित जाती | 38. | खुला |
| 14. | खुला | 39. | खुला |
| 15 | खुला | 40. | खुला |
| 16. | खुला | 41. | अनुसूचित जाती |
| 17. | भटक्या जमाती (ब) | 42. | खुला |
| 18. | खुला | 43. | खुला |
| 19. | खुला | 44. | खुला |
| 20. | खुला | 45. | अनुसूचित जाती |
| 21. | अनुसूचित जाती | 46. | खुला |
| 22. | खुला | 47. | खुला |
| 23. | खुला | 48. | खुला |
| 24. | खुला | 49. | अनुसूचित जाती |
| 25. | अनुसूचित जमाती | 50. | खुला |

## वर्गानुसार आरक्षित पदे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | — | बिंदू क्रमांक | — | 1 9 21 29 41 45 49 | = 7 |
| अनुसूचित जमाती | — | बिंदू क्रमांक | — | 3 13 25 37 | = 4 |
| विमुक्त जाती / भटक्याजमाती | — | बिंदू क्रमांक | — | अ-5, ब-17, अ/ब-33 | = 3 |
| विशेष मागास प्रवर्ग | — | बिंदू क्रमांक | — | 7 | = 1 |
| खुले | — | बिंदू क्रमांक | — | 2 4 6 8 10 11 12<br>14 15 16 18 19 20 22<br>23 24 26 27 28 30 31<br>32 34 35 36 38 39 40<br>42 43 44 46 47 48 50 | = 35 |

---

P.U.P.—500-7-97 (573) [DTP m-3]

आर. के. सभरवाल आणि इतर विरुद्ध पंजाब राज्य प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने आरक्षणाबाबतचे आदेश

## महाराष्ट्र शासन
## सामान्य प्रशासन विभाग
### शासन निर्णय : क्र. बी.सी.सी.१०९७/प्र.क्र. ६३/९७/१६-ब
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७

**शासन निर्णय :** सर्वोच्च न्यायालयाने आर. के. सभरवाल आणि इतर विरुद्ध पंजाब राज्य, यांच्या प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने असा निर्णय घेतला होता की, केंद्र शासनाने किंवा इतर राज्य शासनाने आदेश निर्गमित केल्यानंतर शासन त्याप्रमाणे आदेश निर्गमित करील.

२. केंद्र शासनाने त्यांच्या ज्ञापन क्रमांक ३६०१२/२/९६-ईएसटीटी(आरईएस), दिनांक २ जुलै, १९९७ अन्वये वरील याचिकेसंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वासंबंधीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. ते विचारात घेऊन, सेवा भरती व बिंदूनामावलीसंदर्भात शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे :

(१) आरक्षण हे संवर्गाच्या पदसंख्येस (संवर्गातील एकूण पदांची संख्या विचारात घेऊन टक्केवारीनुसार) लावावे. रिक्त होणाऱ्या जागांच्या संदर्भात लावू नये. बिंदू नामावली ही आरक्षणाची विहित टक्केवारी पूर्ण होईपर्यंत वापरात ठेवावी. विहित टक्केवारी पूर्ण होताच बिंदू नामावली वापरण्याची आवश्यकता नाही. त्यानंतर ज्या प्रवर्गाची जागा रिक्त होईल त्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांद्वारे उपयोगात आणला अशी नोंद घ्यावी.

(२) गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची आरक्षण पदावर गणना करण्यात येऊ नये व त्याची नियुक्ती आरक्षण बिंदूवर दर्शवू नये. त्याची गणना खुल्या प्रवर्गात करावी.

(३) वर (१) येथे नमूद केल्यानुसार बिंदू नामावली ही रिक्त होणाऱ्या पदावर आधारित नसावी. ती संवर्गाच्या संख्येवर आधारित असावी.

(४) बिंदू नामावली ही मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आहे. ज्येष्ठता निश्चित करण्यासाठी नाही.

(५) बिंदू नामावली वापरताना खालील मूलभूत तत्त्वे विचारात घ्यावीत :

**१) मागास प्रवर्गांना विहित केलेले आरक्षण हे टक्केवारीनुसार असावे व एकूण आरक्षण हे प्रचलित आरक्षणानुसार संवर्गाच्या ५२ टक्केपेक्षा जास्त असता कामा नये.**

**२) सरळ सेवा भरतीसाठी आणि पदोन्नतीसाठी वेगळी बिंदू नामावली ठेवावी. याव्यतिरिक्त अन्य भरती माध्यम असल्यास त्यासाठीदेखील वेगळी बिंदू नामावली ठेवावी.**

(६) बदली, प्रतिनियुक्तीच्या पदांना बिंदू नामावली वापरू नये.

(७) 'मागासवर्गीयांना सेवेत आरक्षण व इतर सवलती' या पुस्तिकेतील प्रकरण १(अ) २ पृ. १८/१९ यातील आदेश विचारात घेऊन छोट्या संवर्गाचे गट करण्यात यावेत.

(८) एकाकी पदास बिंदू नामावलीनुसार आळीपाळीने आरक्षण ठेवावे. सुरुवातीस अनुसूचित जाती व त्यानंतर खुला असे आळीपाळीने (एका आड एक) या तत्त्वावर याचे पालन व्हावे.

(९) यापुढे पदोन्नतीमध्ये भटक्या जमाती (क), धनगर व तत्सम यांना ३.५ टक्के व भटक्या (ड) वंजारी व तत्सम यांना २ टक्के आरक्षण विहित करण्यात येत आहे. नवीन १०० बिंदू नामावली सोबत जोडलेली आहे. ती १९९६-९७ च्या निवड सूचीपासून अमलात आणावी आणि तसे करताना बिंदू क्र. १ पासून ती वापरावी. हे आरक्षण त्या त्या निवड सूची वर्षापुरते राहील. तसेच ते ''अ'', ''ब'', ''क'' व 'ड'' या प्रवर्गात अंतर्गत परिवर्तनीय (Internally Transferable) राहील.

...२...

३. वरील आदेशानुसार बिंदू नामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सविस्तर सूचना सोबतच्या परिशिष्टात नमूद करण्यात आल्या आहेत. हे आदेश दिनांक २ जुलै, १९९७ पासून अमलात येतील. त्यापूर्वी तयार करण्यात आलेल्या निवडसूच्या अंतिम करण्यात आल्या असल्यास, त्यांत बदल करण्याची आवश्यकता नाही. यापुढे सरळ सेवा भरती किंवा पदोन्नतीचे प्रस्ताव विचारात घेताना त्या त्या संवर्गातील आरक्षित पदधारकांची संख्या विचारात घेऊन, कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/- रवि भू. बुद्धिराजा

...३...

## परिशिष्ट

### बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना

(१) सरळ सेवा भरतीकरिता शासन निर्णय : क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/१६-ब, दिनांक २९-३-१९९७ नुसार विहित केलेली १०० बिंदू नामावली वापरण्यात यावी.

(२) सेवा प्रवेश नियमानुसार प्रत्येक भरती माध्यमांकरिता (सरळ सेवा व पदोन्नती इत्यादी) वेगवेगळी बिंदू नामावली दर्शविण्यात यावी. बिंदू नामावलीचा वापर करताना सेवा भरती नियमातील तरतुदी विचारात घ्याव्यात.

(३) बिंदू नामावली ही मागास प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आहे. ज्येष्ठता निश्चित करण्यासाठी नाही.

(४) सध्या असलेली संवर्गातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदू निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास अथवा घट झाल्यास आरक्षण बिंदूंची संख्या त्यानुसार त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

(५) जेथे सध्या विहित आरक्षणापेक्षा जास्त नियुक्त्या करण्यात आल्या आहेत त्यामुळे सध्याच्या तेथील नियुक्त्यांना बाधा येणार नाही.

(६) सर्व मंत्रालयीन विभागप्रमुखांनी यानुसार तातडीने कार्यवाही करून प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनेनुसार आढावा घ्यावा व त्यानुसार कार्यवाही करावी.

(७) सध्या अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरीलप्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहीत धरण्यात यावे.

(८) पदोन्नतीच्या वाट्यातील पदे भरण्यासाठी निवड सूची बनविताना आणि पदोन्नतीच्या वाट्याबाहेरील अन्य पदांवर तात्पुरत्या पदोन्नत्या देण्यासाठी पदोन्नती सूची बनविताना दोन वेगवेगळ्या बिंदू नामावल्या वापराव्यात.

...४...

## पदोन्नतीची १०० बिंदू नमुनेवजा नामावली

| | | | |
|---|---|---|---|
| १. अनु. जाती | २६. खुला | ५१. अनु. जाती | ७६. खुला |
| २. अनु. जमाती | २७. अनु. जाती | ५२. खुला | ७७. भ.ज.(ड) |
| ३. वि.जा.(अ) | २८. खुला | ५३. अनु. जमाती | ७८. खुला |
| ४. भ.ज.(क) | २९. खुला | ५४. खुला | ७९. खुला |
| ५. खुला | ३०. खुला | ५५. खुला | ८०. खुला |
| ६. खुला | ३१. भ.ज.(क) | ५६. खुला | ८१. अनु. जाती |
| ७. भ.ज.(ब) | ३२. खुला | ५७. भ.ज.(क) | ८२. खुला |
| ८. खुला | ३३. अनु. जमाती | ५८. खुला | ८३. वि.जा.(अ) |
| ९. खुला | ३४. खुला | ५९. खुला | ८४. खुला |
| १०. खुला | ३५. खुला | ६०. खुला | ८५. खुला |
| ११. भ.ज.(ड) | ३६. खुला | ६१. अनु. जाती | ८६. खुला |
| १२. अनु.जाती | ३७. अनु. जाती | ६२. खुला | ८७. वि.मा.प्र. |
| १३. खुला | ३८. खुला | ६३. अनु. जमाती | ८८. खुला |
| १४. खुला | ३९. खुला | ६४. खुला | ८९. खुला |
| १५. वि.मा.प्र. | ४०. खुला | ६५. खुला | ९०. खुला |
| १६. खुला | ४१. वि.जा.(अ) | ६६. खुला | ९१. अनु. जाती |
| १७. खुला | ४२. खुला | ६७. अनु. जाती | ९२. खुला |
| १८. खुला | ४३. अनु. जाती | ६८. खुला | ९३. अनु. जमाती |
| १९. खुला | ४४. खुला | ६९. खुला | ९४. खुला |
| २०. खुला | ४५. खुला | ७०. खुला | ९५. खुला |
| २१. अनु. जाती | ४६. खुला | ७१. अनु. जमाती | ९६. खुला |
| २२. खुला | ४७. भ.ज.(ब) | ७२. खुला | ९७. अनु. जाती |
| २३. अनु. जमाती | ४८. खुला | ७३. अनु. जाती | ९८. खुला |
| २४. खुला | ४९. खुला | ७४. खुला | ९९. भ.ज.(ब/क) आळीपाळीने |
| २५. खुला | ५०. खुला | ७५. खुला | १००. खुला |

पु.वि.मु.—५००-१ -९६ (१५०३) (म-३)

शासन सेवेत सरळ सेवा भरतीसाठी समांतर आरक्षण (Horizontal Reservation) कार्यान्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-1097/प्र.क्र.31/98/16-अ,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 16 मार्च 1999.

वाचा:
1. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1077/3576/1433/16-अ, दि.23.5.1978.
2. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसईएम-1080/35/16-अ, दि.21.1.1980.
3. शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र.आरपीई/आरटीए-1080/0/181/16-अ, दि.10.10.1980.
4. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1094/1004/प्र.क्र.30/16-अ, दि.17.11.1994.
5. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब, दि.12.8.1994.
6. शासन निर्णय, न.व.वि. क्र.इक्युआर-1094/प्र.क्र.768/भूपुक-1, दि.9.8.1995.
7. शासन निर्णय, म.व.बा.क.वि. क्र.संकीर्ण-1096/प्र.क्र.30/का.-2, दि.1.8.1997.
8. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-1097/प्र.क्र.2/97/16-ब, दि.6.8.1997.
9. शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1097/प्र.क्र.12/97/16-अ, दि.2.5.1998.
10. अनिल कुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-1995(5)एससी-505) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्वे.

परिपत्रक :- शासनाने सेवेतील भरतीसाठी मागासवर्गीयांसाठी आरक्षण लागू केले आहे. हे आरक्षण सामाजिक आरक्षण (Social Reservation) असल्याने ते उभे आरक्षण (Vertical Reservation) आहे. त्याचप्रमाणे विशेष आरक्षण (Special Reservation) मागासवर्गीयांव्यतिरिक्त अन्य घटकांसाठी लागू केलेले आहे व ते समांतर किंवा आडवे आरक्षण (Horizontal Reservation) आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने (अॅपलेट साईड) रिट याचिका क्रमांक:4067/1998 वरील निर्णयान्वये अनिलकुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-1995(5)एससी-505) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयास अनुसरुन समांतर आरक्षणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सेवेतील उभे आरक्षण व समांतर आरक्षणाच्या संदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती व त्या बाबतच्या मार्गदर्शक सूचना शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/विद्यापिठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावे.

2. सेवेतील नियुक्तीसाठी सामाजिक आरक्षण (उभे आरक्षण) खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| 1. अनुसूचित जाती | : | 13% |
| 2. अनुसूचित जमाती | : | 7% |
| 3. विमुक्त जाती (अ) | : | 3% |
| 4. भटक्या जमाती (ब) | : | 2.5% |
| 5. भटक्या जमाती (क) | : | 3.5% |
| 6. भटक्या जमाती (ड) | : | 2% |
| 7. विशेष मागास प्रवर्ग | : | 2% |
| 8. इतर मागास वर्ग | : | 19% |

वर नमुद केलल्या आरक्षणाव्यतिरिक्त सेवेतील नियुक्त्यांसाठी लागू असलेले विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) पुढीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| 1. माजी सैनिक | 15% फक्त गट क आणि गट ड साठी |
| 2. प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त | 5% फक्त गट क आणि गट ड साठी |
| 3. अपंग | 3% गट अ आणि ब मधील कांही पदांसाठी तसेच गट क आणि गट ड साठी |
| 4. महिला | 30% |

(पु. पा. प.)

समांतर आरक्षण हे फक्त सरळ सेवा भरतीस लागू राहील. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्याला सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येऊ नये.

4. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्या प्रमाणे समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण ( Compartmentalised Reservation ) आहे, म्हणून पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत केवळ सामाजिक आरक्षणाची पदसंख्याच नमूद न करता सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा., अ.ज., वि.ज.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) वि.मा.प्र., इ.मा.व. आणि खुला प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार येणा-या राखीव पदांची संख्या सुध्दा निर्देशित करावी.

5. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात/उल्लेखिलेल्या नुसार समांतर आरक्षणांतर्गत त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सरळसेवा भरती करताना खालील टप्पे विचारात घेण्यात यावेत :-

(अ) प्रथम टप्पा :- गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी, या यादीत, समांतर आरक्षणात बसणा-यांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्‌भवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर समांतर आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर समांतर आरक्षणाकरीता त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांना उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ट करावेत.

(ब) दुसरा टप्पा :- त्यानंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार कराव्यात (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा 'अ' मध्ये सामिल झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे.)

(क) तिसरा टप्पा :- वरील 'ब' नुसार तयार करण्यात आलेल्या याद्यांमध्ये सामाजिक आरक्षणातील (Social Reservation ) प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार 'अ' येथे विशद केलेल्या कार्यपध्दतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गांतर्गत राहावे.

6. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्यानुसार विशेष आरक्षण हे प्रत्येक उभ्या आरक्षणाच्या कक्षांतर्गत राहील. म्हणजेच विशेष आरक्षण हे एका सामाजिक आरक्षण प्रवर्गातून दुस-या सामाजिक आरक्षण प्रवर्गात स्थानांतरीत करता येणार नाही.

7. सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी वरील कार्यपध्दती तसेच सूचनांनुसार यापुढे न चुकता कार्यवाही करावी. हे आदेश शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/विद्यापिठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भि.रा.वाढवे,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
उप मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा, खंडपीठ, औरंगाबाद,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, अपील शाखा, खंडपीठ, औरंगाबाद,
* प्रबंधक, लोकआयुक्त आणि उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

---

* पत्राने.

मचं-१४४८(५०००-३-०७)-अ.

GR-200406251252250001-0100



**पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागू करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
**दिनांक : २५ मे, २००४**

**पहा** :- १) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी १०७२/जे, दिनांक २३ मे १९७४.
२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७४ /डी, दिनांक २८ जानेवारी १९७५.
३)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०८९/२५५१ (अ) / १६ब, दिनांक २३ जानेवारी १९९१.
४)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६ब, दिनांक १८ ऑक्टोबर १९९७.

**प्रस्तावना :-** मागासवर्गीय अधिकारी /कर्मचारी यांना पदोन्नतीमध्ये शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०७२/जे, दिनांक २३ मे १९७४ अन्वये आरक्षणाचे तत्व लागू करण्यात आले होते. तसेच शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०७४/डी , दिनांक २८ जानेवारी १९७५ अन्वये कनिष्ठ स्तरावरुन वरीष्ठ स्तरावर पदोन्नती देताना पाळावयाची तत्वे विशद केलेली असून या शासन निर्णयान्वये वर्ग १ च्या पहिल्या पदापर्यंतची (पहिल्या टप्प्यापर्यंत ) पदोन्नती, ही " योग्यतेनुसार वरिष्ठता " ( seniority subject to fitness) या तत्वावर मागासवर्गीयाकरीता असलेले आरक्षण विचारात घेवून करण्याबाबत आदेश होते. या शासन निर्णयानुसार वर्ग-१ च्या पहिल्या पदानंतरची (पहिल्या टप्प्यानंतरची ) पदोन्नती "काटेकोर निवड" पध्दतीद्वारे (By strict selection ) करण्याबाबत आदेश दिलेले असून, त्यानुसार वर्ग १ च्या पहिल्या पदानंतरच्या पुढील पदांना / टप्प्यांना आरक्षणाचे तत्व लागू केलेले नव्हते. याशिवाय शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०८९/२५५१ (अ) /१६ ब ,दिनांक २३ जानेवारी १९९१ अन्वये ज्या सेवा / संवर्गा मध्ये सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक नाही, अशा सेवा /संवर्गामधून पदोन्नतीसाठी आरक्षण विहीत करण्याबाबत आदेश दिलेले होते. म्हणजेच ज्या सेवा/ संवर्गामध्ये सरळ सेवाभरतीचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक होते अशा वर्ग ४ ते वर्ग १ च्या पहिल्या टप्प्यापर्यंतच्या पदामध्ये पदोन्नती करीता आरक्षण लागू नव्हते.

12 २. सद्यःस्थितीत महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २९/१/२००४ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार सान २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मधील (आरक्षण कायदा ) कलम ५ मध्ये खालील प्रमाणे तरतूदी केलेल्या आहेत.

**(अ) कलम ५ पोटकलम (१) पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर असेल .**

**(ब) पोटकलम (२) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास , पदोन्नतीद्वारे भरावयाच्या कोणत्याही पदासाठी आरक्षणाची तरतूद करणारे शासनाचे आदेश अंमलात असल्यास, शासनाकडून त्यामध्ये फेरफार करण्यात आला नसेल किंवा ते रद्द करण्यात आले नसतील तर ते अंमलात असल्याचे चालू राहतील.**

३. सध्या प्रचलित असलेल्या दिनांक २३ मे १९७४, २८ जानेवारी १९७५ व २३ जानेवारी १९९१ चे शासन निर्णय अधिक्रमित करुन आता नव्याने लागू केलेल्या वरील अधिनियमाच्या कलम ५ पोटकलम (१) व (२) च्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**<u>शासन निर्णय :-</u>**

(अ) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मधील (आरक्षण कायदा) च्या कलम ५ मधील पोटकलम (१) नुसार जेथे पदे पदोन्नतीने भरली जातात तेथे आरक्षणाचे तत्व लागू होईल . त्यानुसार दिनांक २३/१/१९९१ च्या शासन निर्णयातील तरतूद रद्द करुन सरळ सेवेचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक असले तरीही उर्वरीत पदोन्नतीच्या पदांना आरक्षण लागू राहील.

(ब) पदोन्नतीमधील आरक्षण हे खालीलप्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| १)अनुसूचीत जाती | १३ % |
| २)अनुसूचीत जमाती | ७ % |
| ३)विमुक्त जाती (अ) | ३ % |
| ४)भटक्या जमाती ( ब) | २.५% |
| ५)भटक्या जमाती (क) | ३.५% |
| ६)भटक्या जमाती (ड) | २ % |
| ७)विशेष मागास प्रवर्ग | २ % |
| एकूण | ३३ % |

(क) जेथे पदोन्नतीकरीता सेवा प्रवेश नियमात तरतूद आहे तेथे पदोन्नती करीता अद्यापपर्यंत ज्या टप्प्यांना वा संवर्गांना आरक्षण लागू नव्हते, आता त्या पदोन्नतीच्यां सर्व टप्प्यांना / संवर्गांना आरक्षणाचे तत्व दिनांक २९/१/२००४ पासून लागू होईल.

(ड) जे मागासवर्गीय अधिकारी वर्ग १ च्या वरील टप्प्यात दिनांक २९/१/२००४ या तारखेपर्यंत पदोन्नत झालेले आहेत ते सर्व सेवाजेष्ठता व गुणवत्तेनुसार झाले आहेत असे समजण्यात यावे .

(इ) या अधिनियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीने भरण्यात येणारी आरक्षणाची पदे यापुढे रिक्त होणा-या पदांच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने भरण्यात यावीत.

(फ) नव्याने आरक्षण लागू केलेल्या संवर्गाना / पदांना सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक: बीसीसी -१०९७/प्र.क्र. ६३/९७/१६-ब , दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णयातील आरक्षणा संबंधीचे आदेश लागू राहतील. मात्र ज्या संवर्गात नव्याने आरक्षण लागू करण्यात येणार आहे त्या संवर्गातील मंजूर पदांवर एकाच वेळी आरक्षण न लावता त्या संवर्गातील दिनांक २९/१/२००४ पासून रिक्त होणा-या पदांवरील टक्केवारी विचारात धेवून आरक्षणाची पदे विचारात घ्यावीत.

(ग) दिनांक २९/१/२००४ पूर्वी सुरु केलेल्या निवड प्रक्रियेमध्ये वर्ग १ च्यां पुढील टप्प्यामध्ये तसेच ज्या पदोन्नतीच्या टप्प्यांना आरक्षण लागू नव्हते अशा पदोन्नतीच्या टप्प्यांमध्ये सदर अधिनियमाच्या तरतूदी लागू होणार नाहीत. मात्र दिनांक २९/१/२००४ च्या नंतरच्या निवड प्रक्रियेमध्ये अधिनियमातील तरतूदीनुसार आरक्षणाचे तत्व लागू राहिल.

४. वरील आदेश मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख याच्या निदर्शनास आणून वरील आदेशांची योग्य अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने,

(युपी.एस.मदान)
सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव /अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव , सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय , मूळ शाखा , मुंबई,
* प्रबंधक , उच्च न्यायालय , अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक , लोकआयूक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,
* सचिव , महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* आयुक्त, अनुसूचित जाती जमाती , भारत सरकार , पाचवा माळा, लोकनायक भवन , नवीदिल्ली
* उप संचालक, अनुसूचित जाती जमाती आयोग , भारत सरकार , चिपळणूकर भवन, शात्री मार्ग नवीपेठ, पुणे , ४११०३०.
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन , कोपर्निकस मार्ग, नवीदिल्ली ११०००१
संचालक, समाज कल्याण, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास , नाशिक
आयुक्त , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
संचालक,रोजगार व स्वंयरोजगार विभाग , मुंबई ,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती,
* पत्राने

**अनुसूचित जाती कल्याण समिती व विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समितीने बिंदूनामावली व आरक्षणाची पदे भरण्याबाबत केलेल्या सुचनांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक:बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ५ नोव्हेंबर, २००९

**संदर्भ :** १) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०६४/१११/जे, दि. ९ एप्रिल, १९६५.
२) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०७२/इसीआर-जे, दि. २७ जून, १९७४.
३) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०८५/२९८८/१६-ब, दि. १३ ऑगस्ट, १९८६.
४) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०९१/२५५१(क)/१६-ब, दि.२७ मार्च, १९९१.
५) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०९४/सीआर ५७/९४/१६-ब, दि. ५ डिसेंबर, १९९४.
६) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०९७/सीआर २/१६-ब, दि. २९ मार्च, १९९७.
७) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दि.१८ ऑक्टोबर, १९९७.
८) महाराष्ट्र आरक्षण कायदा क्रमांक ८/२००४.
९) शासन निर्णय,क्रमांक: बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २५ मे, २००४,
१०) शासन निर्णय,क्रमांक:बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब,दि.२६ ऑक्टोबर, २००४.
११)शासन निर्णय,क्रमांक: बीसीसी २००८/प्र.क्र.४०७/०८/१६-ब, दि. २७ ऑक्टोबर, २००८.
१२) शासनपत्र क्रमांक: बीसीसी २००९/प्र.क्र.३३५/०९/१६-ब, दि. ६ एप्रिल २००९
१३) शासनपत्र क्रमांक: बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दि. ११ मे २००९

**प्रस्तावना :**

मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणांच्या आदेशांचे योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत मागासवर्ग कक्षाची स्थापना जून १९७४ मध्ये तर क्षेत्रीय स्तरावर विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली मागासवर्ग कक्षाची स्थापना दि. १३ ऑगस्ट, १९८६ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे, व या दोन्ही कक्षांची कार्यकक्षा सुद्धा निश्चित करुन देण्यात आली आहे. त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर सहाय्यक आयुक्त (मावक) यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयातील वर्ग ३ व ४ च्या कर्मचा-यांच्या बिंदूनामावल्या तपासून प्रमाणित करावयाच्या आहेत. राज्यातील सर्व वर्ग १ व वर्ग २ अधिकाऱ्यांच्या

बिंदूनामावल्या मंत्रालयातील मागासवर्ग कक्षाने तपासून प्रमाणित करावयाच्या आहेत. शासनाचे याबाबत स्थायी शासकीय आदेश असतानाही बहुतांशी शाळा/महाविद्यालये, विद्यापीठे, शासकीय कार्यालये यांच्या बिंदू नामावल्या योग्य रित्या प्रमाणित केल्या जात नाहीत असे निदर्शनास आले आहे. शालेय शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बिंदूनामावल्या सध्या शिक्षणाधिकारी / उपसंचालक (शिक्षण ) यांचेकडून तपासून देण्यात येत आहेत. या बिंदूनामावल्या सहायक आयुक्त (मावक) यांनी प्रमाणित करावयाच्या आहेत. तथापि अशा प्रकारची कार्यवाही होताना दिसून येत नाही. यामुळे बिंदूनामावल्या प्रमाणित करावयाच्या कार्यवाहीत मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळून आल्या आहेत. या अनुषंगाने शासनाने संदर्भाधीन क्र.१२ येथील पत्रान्वये, त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील बिंदुनामावल्यांना सहायक आयुक्त (मावक)/ मंत्रालयीन मागासवर्ग कक्ष यांची अंतिम मान्यता असल्याखेरीज नियुक्ती/ पदोन्नतीची कार्यवाही करण्यात येऊ नये. जर काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये अशी मान्यता घेणे शक्य झाले नसल्यास अशा बिंदूनामावल्यांना ६ महिन्यांच्या आत सहाय्यक आयुक्त (मावक)/ मंत्रालयीन मागासवर्ग कक्ष यांची अंतिम मान्यता आवश्यक राहील अशा सूचना निर्गमित केल्या आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजा/भज व इमाव कल्याण समितीने शासनाच्या बिंदुनामावल्या तपासण्याच्या सद्याच्या कार्यपद्धतीमध्ये असलेल्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत. या सर्व बाबी विचारात घेवून संदर्भाकीत क्र. १२ येथील पत्रान्वये दिलेल्या सूचना आता रद्द करुन आता खालीलप्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत :

## परिपत्रक

१) सरळसेवा प्रवेशासाठी शासन निर्णय क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/१६-ब, दि.२९ मार्च १९९७ अन्वये तसेच पदोन्नतीसाठी शासन निर्णय क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दि.१८ ऑक्टोबर १९९७ अन्वये स्वतंत्र १०० बिंदूनामावली निश्चित केली आहे. बिंदूनामावली नोंदवह्या अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिका-यांची आहे व बिंदूनामावल्या कशा प्रकारे ठेवाव्यात याविषयी स्पष्ट सूचना शासनाच्या दि. २३.११.१९७० च्या शासन परिपत्रकान्वये दिल्या आहेत. असे असतानाही शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अद्याप बऱ्याच कार्यालयांनी बिंदूनामावल्याच ठेवेलेल्या नाहीत. बिंदूनामावल्या न ठेवता नियुक्त्या व पदोन्नत्या देण्याची कार्यवाही करणे हे शासनाच्या आरक्षण विषयक धोरणाशी विसंगत आहे. तरी सर्व प्रशासकीय विभागांनी, तसेच त्यांच्या

अधिनस्त ज्या कार्यालयांनी अद्याप बिंदूनामावल्या ठेवलेल्या नाहीत त्यांनी त्या त्वरीत तयार करुन या परिपत्रकाच्या सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्यांकडून त्या प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

२. विद्यपिठांतर्गत कार्यरत असलेल्या मागासवर्ग कक्षास, त्याचबरोबर शालेय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयाच्या/शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बिंदूनामावल्या प्रमाणित करण्याचे कोणतेही आदेश या विभागाने दिलेले नसतानाही या कार्यालयांकडून /अधिकाऱ्यांकडून परस्पर मागासवर्ग कक्षाची मान्यता न घेता बिंदू नामावल्या प्रमाणित केल्या जात आहे. बिंदू नामावल्या, या परिपत्रकाच्या प्रपत्र "अ" मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्यांशिवाय इतर अधिकाऱ्यांनी प्रमाणित केल्या असल्यास व त्यानुसार नियुक्त्या/पदोन्नती देण्याची कार्यवाही केली असल्यास सदरहू कार्यवाही ही नियमबाह्य ठरते व अशा नियमबाह्य कार्यवाहीस संबंधित नियुक्ती प्राधिकारी व्यक्तिश: जबाबदार राहतील.

३. सरळसेवा व पदोन्नतीमध्ये छोट्या संवर्गाच्या बाबतीत मागास प्रवर्गाची आरक्षणाची पदे कशी भरावीत या विषयीच्या स्पष्ट सूचना ह्या विभागाने शासन निर्णय दि.५-१२-१९९४ व शासन परिपत्रक क्र. दि. २७.१०.२००८ अन्वये दिलेल्या आहेत. असे असतानाही मागासप्रवर्गाची पदे भरताना या सूचनांकडे दुर्लक्ष होत आहे असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव वर उल्लेखित शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील सूचना नुसार आरक्षणाची पदे भरण्याची कार्यवाही काटेकोरपणे करण्याबाबत पुन्हा सूचना देण्यात येत आहेत.

४. सरळसेवेची पदे भरत असताना मागासप्रवर्गाची पदे उमेदवारांअभावी रिक्त रहात असल्यास अशी पदे अदलाबदलीने भरण्याची कार्यपद्धती शासन निर्णय दि. ५ डिसेंबर, १९९४ अन्वये निश्चित करण्यात आली आहे. असे असतानाही ब-याच विभागाकडून / कार्यालयाकडून मागासप्रवर्गाच्या बिंदूवर परस्पर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांना शासनाची मान्यता न घेता नियुक्त्या दिल्या जात आहेत. विशेषकरुन विना अनुदानित / अनुदानित संस्थाचे बाबत ही बाब प्रामुख्याने निदर्शनास आली आहे. यास्तव सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालय प्रमुख / नियुक्ती प्राधिकारी यांच्या निदर्शनास वर उल्लेखित दि.५ डिसेंबर, १९९४ च्या शासन निर्णयातील तरतुदी, तसेच आरक्षण कायद्यातील सर्व प्रमुख तरतूदी निदर्शनास आणाव्यात. मागासवर्गीयांच्या राखीव

बिंदूवर खुल्या प्रवर्गातून नियुक्त्या दिल्या असल्यास अशी सर्व प्रकरणे सामान्य प्रशासन विभागा (मागासवर्ग कक्ष) च्या निदर्शनास आणावीत आणि अशा सर्व नियुक्त्या रद्द करुन, रिक्त होणा-या जागा मागासप्रवर्गातून भरण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

५. आरक्षण कायदा २००४ नुसार आरक्षण कायद्यातील तरतुदींचा भंग करुन केलेल्या नियुक्त्या अथवा पदोन्नत्या या नियमबाहय ठरतात. यास्तव सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी याविषयी सर्वंकष आढावा घेऊन मागास प्रवर्गांच्या जागांवर बिगर मागासप्रवर्गाच्या कर्मचारी/अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही याची खात्री करुन घ्यावी. जर अशा प्रकारे गैरमार्गाने नियुक्त्या केलेल्या असल्यास त्वरीत अशा नियुक्त्या रद्द करुन रिक्त होणारी पदे संबंधित मागास प्रवर्गातून त्वरीत भरावीत. अन्यथा अशा अनियमिततेस नियुक्ती प्राधिकारी हे व्यक्तिश: जबाबदार राहतील.

६. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही शैक्षणिक संस्था मधील आदिवासी प्रवर्गाच्या जागा बऱ्याच वर्षापासून रिक्त आहेत. मुलाखतीसाठी आदिवासी प्रवर्गातील उमेदवार उपस्थित राहतात. परंतु त्यांना नियुक्ती न देता जागा रिक्त ठेवण्यात येतात. ही बाब गंभीर असून जोपर्यन्त अनुशेष आहे तोपर्यंत विशेष भरती मोहिम राबवून मागास प्रवर्गाच्या अनुशेषाची पदे भरण्याची कार्यवाही सुरु ठेवावी अशा स्पष्ट सूचना शासनाने वेळोवेळी दिलेल्या आहेत. मागास प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध असूनही त्यांना नियुक्त्या न देता अनुशेष पुढे ओढणे यासारख्या बाबी जर काही शासकीय विभागांनी / कार्यालयांनी केल्या असल्यास संबधित नियुक्ती प्राधिकारी यांनी याविषयी संबंधित सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांचेमार्फत याबाबतचा सविस्तर अहवाल संबंधित प्रशासकीय विभाग व सामान्य प्रशासन विभाग मागासवर्ग कक्षास सादर करणे आवश्यक आहे.

७. मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र असल्याखेरीज यापुढे नियुक्ती अथवा पदोन्नती देण्यात येऊ नये.

८. सरळसेवा / पदोन्नतीद्धारे पद भरती / पदोन्नती करीत असताना निवडसमिती / विभागीय पदोन्नती समितीमध्ये मागासप्रवर्गाच्या प्रतिनिधीचा समावेश करणे आवश्यक आहे.

९. विधान मंडळाच्या, अनुसूचित जाती कल्याण समिती/अनुसूचितजमाती कल्याण समिती /विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती /इतर मागास वर्ग कल्याण समिती यांनी बिंदुनामावली तयार करण्याचे काम विहीत कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे अशी शिफारस शासनास केली आहे. या अनुषंगाने सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्या

अधिपत्याखालील सर्व कार्यालये शैक्षणिक संस्था यांची तपासणी करुन ज्या कार्यालयांनी अद्याप बिंदूनामावली ठेवली नसेल किंवा बिंदूनामावली ठेवली आहे परंतु प्रमाणित केलेली नाही अशा सर्व कार्यालयांनी तीन महिन्याच्या आत कार्यवाही पुर्ण करावी. जोपर्यंत बिंदुनामावली सहाय्यक आयुक्त (मावक) यांच्याकडून प्रमाणित करुन घेतली जाणार नाही तोपर्यंत अशा संस्थाचे पुढील अनुदान रोखण्यात यावे. व अशा संस्थांच्या बाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल अनुदान वितरीत करण्यास सहमती देणाऱ्या अधिकाऱ्यांनी प्रत्येक वर्षी ३१ मे पर्यंत सहायक आयुक्त (मावक) यांना सादर करणे बंधनकारक राहील. सहायक आयुक्त (मावक) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्राप्त होणारे सर्व अहवाल एकत्रित करुन त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रधान सचिव (मावक) यांना ३१ जुलै पर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

१०. अ) प्रत्येक कार्यालयाने बिंदू नामावली बरोबर ठेवली आहे कि नाही तसेच बिंदूनामावलीच्या क्रमानुसार आरक्षणाची पदे भरली आहेत किंवा कसे याची पडताळणी करण्यासाठी प्रत्येक ३ महिन्यास प्रपत्र "ड" मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व कार्यालयांनी २ प्रतीमध्ये सहाय्यक आयुक्त (मावक) यांचेकडे माहिती सादर करावी. सहाय्यक आयुक्त (मावक) यांनी १ प्रत आपलेकडे ठेवून दुसरी प्रत आपल्या अभिप्रायासह प्रधान सचिव (साविस) यांचेकडे सादर करावी.

ब) बिंदू नामावल्या प्रमाणित करणाऱ्या अधिकाऱ्यांना एखाद्या प्रकरणी मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना डावलून अशी पदे खुल्या प्रवर्गातून भरली आहेत ही बाब निदर्शनास आल्यास याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल संबंधित प्रशासकीय विभाग व मंत्रालय मागासवर्ग कक्षास सादर करणे आवश्यक आहे. संबंधित संस्थांना शासनाचे अनुदान वितरीत करणाऱ्या अधिकाऱ्यांनी यापुढे स्वत: जातीने लक्ष घालून या संस्थांनी सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष/मंत्रालयीन मागासवर्ग कक्ष यांनी प्रमाणित केलेल्या बिंदू नामावलीनुसार मागास प्रवर्गाची सर्व पदे भरली आहेत याची खात्री करुन मगच अनुदान वितरीत करणे आवश्यक आहे. अन्यथा बिंदू नामावली प्रमाणित करणारे अधिकारी त्याचबरोबर अनुदान वितरीत करणारे अधिकारी व नियुक्ती प्राधिकारी हे या अनियमिततेस जबाबदार राहतील.

क) प्रधान सचिव (साविस) यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक ३ महिन्यांनी म्हणजेच एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी च्या तिसऱ्या सोमवारी मागास प्रवर्गाच्या सरळसेवा व

पदोन्नतीमधील अनुशेषाबाबत आढावा बैठक घेण्यात येईल. नियुक्ती प्राधिका-यांनी मागासप्रवर्गाच्या अनुशेषाबाबत दिलेली व शासनाकडे सामाजिक संघटना / लोकप्रतिनिधी यांनी दिलेली माहिती याची पडताळणी केली असता पडताळणीअंती नियुक्ती प्राधिकारी / सहाय्यक आयुक्त (मावक) यांनी दिलेली माहितीमध्ये विसंगती आढळून आल्यास अथवा चुकीची माहिती दिल्याचे निदर्शनास आल्यास अशा अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल.

११. राज्यामध्ये आरक्षण कायदा २००४ लागू करण्यात आला आहे. ह्या कायद्यातील कलम ११ मधील तरतुदीनुसार या अधिनियमातील तरतुदीचे उल्लंघन करुन केलेल्या कोणत्याही नियुक्त्या निरर्थक ठरतात. तसेच कलम ८ मधील तरतुदीनुसार आरक्षण कायद्यातील तरतुदींचा हेतूपुरस्सर रितीने भंग होईल अशी कृती करणा-या अधिका-याला ९० दिवसाच्या कारावसाची किंवा रु.५०००/- एवढया दंडाची अथवा दोन्ही, अशा शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. यास्तव सर्व प्रशासकीय विभागांना सूचना करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यालये, स्थानिक मंडळे, सांविधानिक मंडळे, महामंडळे इ. ना उपरोक्त नमूद केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकातील सूचना त्याचबरोबर आरक्षण कायद्यातील महत्वाच्या तरतूदी निदर्शनास आणून द्याव्यात. सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांच्या बिंदूनामावल्या अद्ययावत ठेवून त्यास सहाय्यक आयुक्त (मावक) / मंत्रालयीन मागासवर्ग कक्ष यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावे. सहाय्यक आयुक्त (मावक) व मंत्रालयीन मागासवर्ग कक्ष यांना कार्यालयीन भेटीच्या वेळी आवश्यक ती माहिती सत्वर उपलब्ध करुन द्यावी. जाणीवपुर्वक मागासवर्गीयांबाबत उपस्थित झालेल्या मुद्द्यांना माहिती देण्यास विलंब लावणा-या अधिकारी /कर्मचा-यांवरती शिस्तभंगांची कार्यवाही करण्यात येईल.

सदरहू परिपत्रक शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९११०५१७१२२४००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

सही/-

(एन.आरुमुगम)

प्रधान सचिव, साविस

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,

मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव
अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/ नगरपालिका,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
निवड नस्ती, कार्यासन १६-ब

## प्रपत्र अ

## बिंदूनामावली तयार करणे प्राथमिक तपासणी / अंतिम तपासणी करणारे प्राधिकारी

| अ. क्र. | संबंधित कार्यालय | बिंदूनामावली कोणी ठेवावी | प्राथमिक तपासणी कोणी करावी | बिंदूनामावलीस मान्यता देणारे प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालये (वर्ग ४ ते वर्ग १ संवर्ग) | संबंधित संस्था / नियुक्ती प्राधिकारी | विद्यापीठ मागासवर्ग कक्ष | सहाय्यक आयुक्त (मावक) |
| २ | विद्यापीठ खुद्द वर्ग ३ व वर्ग ४ | नियुक्ती प्राधिकारी | विद्यापीठ मागासवर्ग कक्ष | सहाय्यक आयुक्त (मावक) |
| ३ | विद्यापीठ खुद्द वर्ग २ व वर्ग १ | नियुक्ती प्राधिकारी | सहायक आयुक्त (मावक) | प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावक) |
| ४ | प्राथमिक व माध्यमिक शाळा | नियुक्ती प्राधिकारी | शिक्षण अधिकारी | सहाय्यक आयुक्त (मावक |
| ५ | माध्यमिक शाळांना संलग्न असलेली ज्युनिअर महाविद्यालये | नियुक्ती प्राधिकारी | उपसंचालक, उच्च शिक्षण | सहाय्यक आयुक्त (मावक |
| ६ | शासकीय / निमशासकीय कार्यालये वर्ग २ व वर्ग १ | नियुक्ती प्राधिकारी | संबंधित मंत्रालयीन विभाग | प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावक) |
| ७ | मंत्रालय वर्ग १,२,३ कर्मचा-यांची बिंदूनामावली ठेवणे मंत्रालय वर्ग ४ | नियुक्ती प्राधिकारी | उप सचिव, (आस्थापना)/ साप्रवि-१४ उप सचिव, प्रशासन | प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावक) |
| ८ | राज्यस्तरीय शैक्षणिक संस्था / राज्यस्तरीय कार्यालयातील आस्थापना | नियुक्ती प्राधिकारी | मुख्य कार्यालय ज्या महसूली विभागांमध्ये असेल त्यांचे सहायक आयुक्त (मावक) | प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावक) |
| ९ | इतर सर्व राज्यस्तरीय शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, सहकारी बँका / मुक्त विद्यापीठे | नियुक्ती प्राधिकारी | मुख्य कार्यालय ज्या महसूली विभागांमध्ये असेल त्यांचे सहायक आयुक्त (मावक) | प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावक) |

प्रपत्र - ब

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक १८.१०.१०९७ नुसार

पदोन्नतीच्या छोटया संवर्गासाठी आरक्षित पदांचा तपशील

| मंजूर पदे | आरक्षित पदे | प्रवर्गनिहाय आरक्षण |
|---|---|---|
| १ | निरंक | शासन निर्याय दि.२९-९-१९९८ नुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही. |
| २ | १ | प्रथम अजा-१ तदनंतर अ.जमाती, वि.जा.भ.ज., वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ३ | १ | वरीलप्रमाणे |
| ४ | १ | वरीलप्रमाणे |
| ५ | २ | अ.जा.-१, अ.ज.-१ तदनंतर वि.जा.भ.ज., वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ६ | २ | प्रथम अ.जा.१, अ.ज.-१, वि.जा.भ.ज., वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ७ | २ | वरीलप्रमाणे |
| ८ | ३ | अ.जा.-१, अ.ज.-१, वि.जा.भ.ज.-१, वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ९ | ३ | वरीलप्रमाणे |
| १० | ३ | वरीलप्रमाणे |
| ११ | ४ | अ.जा.-२, अ.ज.-१, वि.जा.भ.ज.-१, व नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |
| १२ | ४ | वरीलप्रमाणे |
| १३ | ४ | वरीलप्रमाणे |
| १४ | ५ | अ.जा.२, अ.ज.१, वि.जा.(अ) १, भ.ज.(क) १ नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |
| १५ | ५ | वरीलप्रमाणे |
| १६ | ५ | वरीलप्रमाणे |
| १७ | ६ | अ.जा.३, अ.ज.१, वि.जा.(अ) १, भ.ज.(क) १ नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |
| १८ | ६ | वरीलप्रमाणे |
| १९ | ६ | वरीलप्रमाणे |
| २० | ७ | अ.जा.३, अ.ज.२, वि.जा.(अ) १, भ.ज.(क) १ नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |
| २१ | ७ | वरीलप्रमाणे |
| २२ | ७ | वरीलप्रमाणे |
| २३ | ८ | अ.जा.३, अ.ज.२, वि.जा.(अ) १, भ.ज.(ब) १, भ.ज.(क) १ नंतर वि.मा.प्र. आळीपाळ |
| २४ | ८ | वरीलप्रमाणे |
| २५ | ८ | वरीलप्रमाणे |
| २६ | ९ | अ.जा.३, अ.ज.२, वि.जा.(अ) १, भ.ज.(ब) १, भ.ज.(क) १ नंतर वि.मा.प्र.१ |
| २७ | ९ | वरीलप्रमाणे |
| २८ | ९ | वरीलप्रमाणे |
| २९ | १० | अ.जा.३, अ.ज.२, वि.जा.(अ) १, भ.ज.(ब) १, भ.ज.(क) १ नंतर वि.मा.प्र.१ आळीपाठ |
| ३० | १० | वरीलप्रमाणे |
| ३१ | १० | वरीलप्रमाणे |
| ३२ | ११ | अ.जा.४, अ.ज.२, वि.जा.(अ) १, भ.ज.(ब) १, भ.ज.(क) १, भ.ज.(ड) १ |

## प्रपत्र -"क"

### शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.२९ मार्च, १९९७ नुसार सरळसेवेकरीता छोट्या संवर्गासाठी आरक्षित पदांचा तपशील

| पदसंख्या | खुले पद | आरक्षणाची पदे | |
|---|---|---|---|
| २ | १ | १ | प्रथम अ.जा. नंतर अ.ज. वि.जा.भ.ज.-इ.मा.व.-वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ३ | २ | १ | प्रथम अ.जा.१ नंतर अ.ज. वि.जा.भ.ज.-इ.मा.व.-वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ४ | २ | २ | प्रथम अ.जा.१ व अ.ज.१ नंतर वि.जा.भ.ज.-इ.मा.व.-वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ५ | ३ | २ | प्रथम अ.जा.१ व अ.ज.१ नंतर वि.जा.भ.ज.-इ.मा.व.-वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ६ | ३ | ३ | प्रथम अ.जा.१, अ.ज.-१, वि.जा.भ.ज.१ नंतर इ.मा.व. -वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ७ | ४ | ३ | प्रथम अ.जा.१, अ.ज.१, वि.जा.भ.ज./इ.मा.व./वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ८ | ४ | ४ | अ.जा.१, अ.ज.१, वि.जा.भ.ज.-१,इ.मा.व.-१ नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ९ | ५ | ४ | अ.जा.-१, अ.ज.-१, वि.जा.भ.ज.-१, इ.मा.व.-१ नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |
| १० | ५ | ५ | अ.जा.-१, अ.ज.-१, वि.जा.भ.ज.-१, इ.मा.व.-२ नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |

## प्रपत्र ड

## मागास प्रवर्गाच्या आरक्षित बिंदूवर इतर प्रवर्गातून केलेल्या नियुक्त्या

कार्यालयाचे नांव :

कार्यालयाचा संपुर्ण पत्ता :

दूरध्वनी क्रमांक :
व दिनांक :

संवर्गाचे नांव :

वेतनश्रेणी :

अहवालाचा महिना

| जाती प्रवर्गाचे नाव | मंजूर पदसंख्या | प्रत्यक्षात मागास प्रवर्गाची भरलेली पदसंख्या | ज्या प्रवर्गासाठी बिंदू आरक्षित होता परंतू प्रत्यक्षात दुस-या प्रवर्गातून पद भरले अशा प्रकरणांची संख्या | स्तंभ क्र.४ बाबतची थोडक्यात कारण-मीमांसा | ज्या प्रवर्गासाठी बिंदू आरक्षित होता त्या प्रवर्गाव्यतिरिक्त दुस-या प्रवर्गातून बिंदू भरण्यास सहमती देणा-या प्राधिका-याचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सहाय्यक आयुक्त (मावक)

कार्यालय प्रमुखाची सही व हुद्दा

शासन परिपत्रक दिनांक ५.११.२००९ मधील क्रमांक ७ च्या आदेशास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने सुधारित आदेश निर्गमित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ डिसेंबर, २०११

वाचा: शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९.

प्रस्तावना :-

शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील क्रमांक ७ मध्ये शासनाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-
"मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र असल्याखेरीज यापुढे नियुक्ती अथवा पदोन्नती देण्यात येवू नये."

याचिका क्र.२१३६/२०११ श्रीकांत चंद्रकांत सैदाणे विरुध्द महाराष्ट्र शासन यासह एकूण १५ याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशान्वये शासन परिपत्रक दि.५.११.२००९ मधील क्रमांक ७ पुढील आदेश रद्द ठरविले आहेत.

शासन निर्णय :-

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश विचारात घेवून शासन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे :-

१) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील क्रमांक ७ मध्ये शासनाने दिलेले आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२) सरळसेवाभरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्याने आदेश निर्गमित करावेत.

३) नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. त्याने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिका-यास सादर करावी. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार, संबंधित जात पडताळणी समितीने उमेदवारांचे जात पडताळणीचे प्रस्ताव सहा महिन्यांच्या आत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर त्यास दिलेले

नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करावेत, आणि त्या उमेदवाराविरुध्द नियुक्ती प्राधिकाऱ्याने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करावी.

याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे, यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील, त्या आदेशाच्या अधीन राहून उपरोक्त आदेश राहतील.

सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिनस्त कार्यालयांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणून द्यावा.

प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी सर्व जात पडताळणी समित्यांना वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निदेश द्यावेत व जात पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा त्यांनी दरमहा आढावा घ्यावा, आढावा घेण्यात आल्यानंतर मासिक प्रगती अहवाल प्रधान सचिव (सा.वि.स.), सामान्य प्रशासन विभाग यांना पाठवावा.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक201112281022221220001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सु. ना. रणखांबे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभाग
यांच्या अंतर्गत असलेल्या सर्व जात पडताळणी समित्यांचे सदस्य सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
निवड नस्ती, कार्यासन १६-ब

मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत जात
वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात
प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील
कार्यवाहीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः बीसीसी -२०१२/ प्र. क्र. ३३२/१२/१६-ब
मंत्रालय, मुंबई -४०००३२.
तारीख: १८ मे, २०१३.

वाचा —

१) शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक १४२०००/प्र.क्र.४३/का.१०, दि. १३.४.२००० (दिनांक २८ मे २००१ च्या शुध्दीपत्रकासह)
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी १०९९/प्र.क्र.१४/का.१०, दि. १६.८.२०००.
३) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी १०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, ५ मार्च २००५
४) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्र.सीबीसी १०/२०१०/प्र.क्र.४७/मावक -५, दि. २६ मार्च २०१०
५) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्र.सीबीसी १०/२०१०/प्र.क्र.५९०/ मावक -५, दि. ८ जून २०११
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि. १५ जून,१९९५

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००४/प्र.क्र.४५/०४/१६-ब, दि. २४ जून,२००४

८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब, दि. ३० जून,२००४

९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००५/प्र.क्र.२८/०५/१६-ब, दि. १५.१२.२००५ (क्र. बीसीसी २०११/प्र.क्र.९२९/११/१६-ब, दि. ७ जानेवारी, २०१२ च्या शुध्दीपत्रकासह)

१०) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००

**शासन परिपत्रक —**

उपरोक्त क्रमांक १ ते ५ येथील शासन निर्णय/परिपत्रक याव्दारे शासनाने शासकीय/ निमशासकीय, इत्यादी कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी (जेथे "कर्मचारी" असा उल्लेख आहे तेथे कर्मचारी व अधिकारी या दोघांचाही समावेश होतो.) आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून तपासून घ्यावी, असे आदेश वेळोवेळी निर्गमित केले आहेत. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अद्याप अनेक मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासून घेण्यासाठी संबंधित जात पडताळणी समितीकडे प्रस्तावच सादर केलेले नाहीत, ही बाब अनुचित आहे. तसेच नियुक्ती प्राधिकारी/आस्थापना अधिकारी यांचेकडूनही शासनाच्या आदेशाचे पालन केले जात नाही, ही बाब गंभीर आहे.

२. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (यापुढे सदर अधिनियमाचा सोयीकरिता अधिनियम २००० असा उल्लेख करण्यात आला आहे.) हा कायदा दिनांक १८.१०.२००१ पासून अंमलात आला आहे. यातील कलम ६ नुसार, शासकीय/निमशासकीय इत्यादीच्या सेवेत कार्यरत असलेल्या प्रत्येक मागासवर्गीय कर्मचाऱ्याने,

आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता, संबंधित जात पडताळणी समितीकडून तपासून घेणे आवश्यक आहे. यातील कलम १० च्या तरतुदीनुसार, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गामध्ये मोडत नसलेल्या, अशा कोणत्याही व्यक्तीने जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन, मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदावर नियुक्ती मिळविली असेल, तर ती व्यक्ती सेवेतून तात्काळ सेवामुक्त केली जाण्यास पात्र ठरते आणि अशा व्यक्तीने घेतेलेले अन्य कोणतेही लाभ काढून घेतले जाण्यास सुध्दा ती पात्र ठरते. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ हा कायदा दिनांक २९.१.२००४ पासून अंमलात आला आहे. यातील कलम ४(१) च्या तरतुदीनुसार, ज्या मागास प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे त्याच मागास प्रवर्गाच्या उमेदवारामधून ते पद भरणे बंधनकारक आहे. हे पाहता, जात प्रमाणपत्राची वैधता तपासून न घेता एखादा कर्मचारी अनेक वर्षे शासन सेवेत रहात असेल, तर ते एक प्रकारे उपरोक्त तरतुदीचे उल्लंघन ठरते. त्यामुळे शासन आता खालील प्रमाणे सूचना देत आहे:-

(१) शासकीय/निमशासकीय इत्यादीच्या सेवेमध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गांमधील) ज्यांनी अद्याप जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात पडताळणी समितीकडे अर्ज सादर केला नाही अशा कर्मचाऱ्यांनी, आपल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी, आवश्यक त्या परिपूर्ण कागदपत्रांसह, अर्ज, संबंधित जात पडताळणी समितीकडे दि. ३१.७.२०१३ पर्यंत करावा व त्याबाबतची पोचपावती संबंधित कार्यालयातील आस्थापना अधिकारी यांना तात्काळ सादर करावी. प्रत्येक कार्यालयातील आस्थापना अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयात कार्यरत असणाऱ्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी सर्व कर्मचाऱ्यांनी दि. ३१.७.२०१३ पर्यंत जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबतचे प्रस्ताव जात पडताळणी समितीस सादर केलेले आहेत याची खातरजमा पावतीसह करुन घ्यावी.

(२) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील कलम ८ नुसार, आपण विशिष्ट जातीचे/ जमातीचे आहोत हे सिध्द करण्याची जबाबदारी संबंधित मागासवर्गीय कर्मचाऱ्यावर आहे. हे पाहता, उपरोक्त मुदतीत जे

मागासवर्गीय कर्मचारी आपल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबतचा अर्ज, संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करणार नाहीत, अशा कर्मचाऱ्यांवर, ते आपला जातीचा दावा सिध्द करु शकत नाहीत असा ठपका ठेवून, त्यांना एक महिन्याच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी एक महिन्याची नोटीस देण्यात यावी. तद्नंतरही जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता न करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सदर कायदयातील कलम -१० नुसार त्यांच्या सेवा समाप्त करण्याची कारवाई करण्यात यावी.

(३) सर्व जात पडताळणी समित्यांना याव्दारे सूचना देण्यात येत आहे की, शासकीय/निमशासकीय, इत्यादी सेवेतील कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याच्या अर्जावर सहा महिन्यांच्या कालावधीत समितीने योग्य तो निर्णय घ्यावा.

(४) जात पडताळणी समितीने जर एखाद्या कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्याच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात याव्यात आणि त्याचेवर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग अधिनियम, २००० मधील कलम ११ नुसार कारवाई करण्यात यावी. या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, अशा परिस्थितीत संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याची कार्यवाही विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन तातडीने करण्यात यावी.

(५) संदर्भाधीन अनुक्रमांक ६ ते ९ येथील आदेशांनुसार, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५.६.१९९५ पूर्वी नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास, त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मात्र अशा कर्मचाऱ्यांनी, ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जे कर्मचारी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकत नाहीत, अशा कर्मचाऱ्यांच्या सेवेस संरक्षण अनुज्ञेय नाही. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५.६.१९९५ पूर्वी नोकरीस लागलेल्या अनेक कर्मचाऱ्यांनी जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज न करता अथवा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र अवैध ठरले जाण्याची वाट न पाहता, अन्य मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करुन सेवेस संरक्षण मिळविले आहे, अशा कर्मचाऱ्यांचे पूर्वीचे मूळ अनुसूचित

जमातीचे जात प्रमाणपत्र अधिनियम २००० मधील कलम ७ च्या तरतुदी नुसार जप्त करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी अशा कर्मचाऱ्यांनी आपले अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र, ज्या प्राधिकाऱ्याने दिले आहे त्या प्राधिकाऱ्याकडे दि. ३१.७.२०१३ पूर्वी जमा करावे व त्याबाबतची पोचपावती, संबंधित कार्यालयाच्या आस्थापना अधिकाऱ्यास सादर करावी अशी पोचपावती, सादर करणे आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांकडे पाठपुरावा करण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांची राहिल. अशाप्रकारे जमा झालेली प्रमाणपत्रे रद्द करण्याची कार्यवाही संबंधित जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याने करावी व त्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांच्या आस्थापना अधिकाऱ्यास कळवावे या संदर्भातील पुढील सूचना, महसूल विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभाग यांनी, संबंधित यंत्रणांना द्याव्यात.

(६) दि. १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे जे कर्मचारी शासनसेवेत लागले आहेत व ज्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे अशा कर्मचाऱ्यांनी, ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र अद्याप सादर केले नसल्यास, प्रथम संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र कायदयातील कलम ७ प्रमाणे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र जप्त करुन घ्यावे व तशी पोच संबंधित कर्मचाऱ्यांना दयावी. अशा पोच पावतीसह संबंधित कर्मचाऱ्यांने ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, जात प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे दि. ३०.६.२०१३ पर्यंत सादर करावीत. त्याकरिता दि. ३०.६.२०१३ ही अंतिम मुदत राहील व दिनांक ३१.७.२०१३ पर्यंत तो ज्या मागास प्रवर्गाचा आहे त्याप्रवर्गाचे जात प्रमाणपत्र त्याने सादर करावे. या मुदतीपर्यंत अशी कार्यवाही जे कर्मचारी करु शकणार नाहीत, अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन तातडीने समाप्त करण्यात याव्यात.

दि. १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्यापैकी, ज्या कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र, तपासणीसाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे अथवा ज्यांनी अद्याप जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्जच सादर केलेला नाही, ते आपण अनुसूचित जमातीपैकी असल्याचा दावा सोडून देवून, ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचा विकल्प स्विकारु शकतात. त्यांनी तसे रुपये १००/- च्या स्टँम्प पेपरवर शपथ पत्राव्दारे संबंधित आस्थापना अधिकाऱ्यास

तातडीने कळवावे आणि त्यांनी त्या शपथपत्राची साक्षांकित प्रत, संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करावी व त्याना त्यांचे अनुसूचित जमातीचे मूळ जात प्रमाणपत्र जप्त करण्याची विनंती करावी आणि त्यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाच्या जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे जात प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे दि. ३०.६.२०१३ पर्यंत सादर करावी व त्याबाबतची पोचपावती संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांस सादर करावी.

(७) जे कर्मचारी दिनांक १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत दाखल झाले व जात प्रमाणपत्राची वैधता तपासून न घेता, दि. १५.६.१९९५ नंतर सेवानिवृत्त झाले आहेत अथवा ज्यांनी दि. १५.६.१९९५ नंतर स्वेच्छा सेवा निवृत्ती घेतली आहे, अशा कर्मचाऱ्यांनी आपल्या अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासून घेवून, या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यात, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त परि.क्र २ (६) मध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. १५ जून १९९५ नंतर सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यानां सुध्दा सदर विकल्प स्वीकारता येईल. जे सेवानिवृत्त कर्मचारी वरील बाबींची पूर्तता या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत करणार नाहीत, त्यांचे सेवानिवृत्ती-वेतन तात्काळ थांबविण्यात येईल, अशा सूचना संबंधित कर्मचाऱ्यास तो ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाला आहे, त्या कार्यालयाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याने तात्काळ द्याव्यात. विहित मुदतीत अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र अथवा ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत, त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (त्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडे परत केले असल्याच्या पोचपावतीसह) सादर न केल्यास, अशा कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती वेतन बंद करण्याची कार्यवाही जात पडताळणी अधिनियम, २००० मधील कलम १० च्या तरतुदीनुसार संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने करावी.

३. सदर शासन परिपत्रकातील आदेश शासकीय/निमशासकीय कार्यालये/ शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था/ जिल्हा परिषदा/नगर परिषदा/ नगरपालिका/ महानगरपालिका/ग्रामपंचायती/मंडळे/महामंडळे/शासनाचे अंगीकृत व्यवसाय/विद्यापीठे/कृषी विद्यापीठे/शासकीय शिक्षण संस्था (आश्रमशाळांसह)/सहकारी संस्था/सहकारी साखर कारखाने/ सहकारी सूतगिरण्या/सहकारी बँका/सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या शासनमान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये, यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/

अनुदान/सहायक अनुदान मिळते अशा सर्व प्रकारच्या संस्था/मंडळे यांच्या आस्थापनेवरील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग या प्रवर्गातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना लागू आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जाती ( विमुक्त जाती ) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम -२००१ च्या कलम २ मध्ये नमुद केलेल्या "आस्थापना" या व्याख्येत समाविष्ट होणाऱ्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनाही लागू आहेत.

४. सदर परिपत्रक प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व विभागप्रमुखांच्या/ नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावे. सर्व विभागप्रमुखांनी/ नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी/ आस्थापना अधिकाऱ्यांनी सदर परिपत्रकातील आदेश, लेखी स्वरुपात संबंधित कर्मचाऱ्यांच्या तात्काळ निदर्शनास आणावेत. याबाबतीत आवश्यक असलेली कार्यवाही तात्काळ करणे संबंधित कर्मचाऱ्यांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०५१८१७२२४९९५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jayant Kumar Banthia

Digitally signed by Jayant Kumar Banthia
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=CS Office, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayant Kumar Banthia
Date: 2013.05.22 16:13:30 +05'30'

**(जयंतकुमार बांठिया)**

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. राज्यपाल यांचे सचिव,

२. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,

३. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

५. मुख्य सचिव,

६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

७. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्व जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना तसेच जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांना सदर परिपत्रकाची प्रत पाठवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

८. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्व जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना तसेच जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांना सदर परिपत्रकाची प्रत पाठवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

९. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या ज्या अधिकाऱ्यांकडून जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही केली जाते त्या अधिकाऱ्यांना सदर परिपत्रकाची प्रत पाठवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

१०. सर्व विभागीय आयुक्त,

११. सर्व जिल्हाधिकारी,

१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

१३. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,

१४. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

१५. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,

१८. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,

१९. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,

२०. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२१. संचालक, समाजकल्याण, पुणे,
२२. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२३. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२४. संचालक, सेवायोजन, मुंबई,
२५. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
२६. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२९. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३०. सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना या परिपत्रकाची प्रत स्वतंत्रपणे पाठवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांच्या स्तरावरुन द्याव्यात.
३१. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३२. निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

दूरध्वनी क्र : (०२०) २६३६१०३२

आयुक्त पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय,
विधान भवन, (मागासवर्ग कक्ष) पुणे-१

क्र:-मावक/वशी/ /२०१३
दिनांक : / /२०१३

प्रती,

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

विषय:- नामावली नोंदवही पडताळणी बाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्रमांक --------------------------दिनांक / /२०१३

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६ ब दि.१८ ऑक्टोबर १९९७ तसेच पदोन्नती करीता आरक्षणाची पदे भरण्या संबंधी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ ब दि.२६/१०/२००४ व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी २००९/ प्र.क्र.२९१/०९, १६ब दि.५/११/२००९ च्या शासन निर्णयान्वये आपले कार्यालयाची १०० बिंदू नामावली नोंदवहीची तपासणी/पडताळणी आवश्यक आहे. त्याकरीता शासन निर्णय क्र बीसीसी/१०९७, प्र.क्र.६३-९७/१६-ब, दिनांक १८/१०/१९९७ व २६/१०/२००४ नुसार दिनांक / /२०१३ रोजी आयुक्त कार्यालय, पुणे विभाग पुणे, मागासवर्ग कक्ष (विधान भवन) येथेसकाळी ११.०० वाजता संबंधीत अधिकारी/माहितगार कर्मचारी यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे रोष्टरतयार करुन तपासणी/पडताळणी करीताहजर रहावे.

१) शासन निर्णय दिनांक १८/१०/१९९७ नुसार रोष्टरतयार करते वेळी सरळसेवा व पदोन्नती करीत स्वतंत्र रजिस्टरमध्ये १०० बिंदू प्रमाणेतयार करणेत यावे. सदर बिंदू नामावली पुढील नमुन्यात लिहीणेत यावी व लिहीताना प्रत्येक बिंदू नंतर किमान ५ ते ६ ओळीसोडण्यांत याव्यात.

अ) सरळसेवा संवर्गासाठी वर्ग-१ ते वर्ग-४ व पदोन्नती वर्ग-३ ते ४ करिता २ जुलै १९९७ या दिवशी कार्यरत असणारे उमेदवारांची बिंदू नामावली खालीलप्रमाणे लिहीणे.

ब) पदोन्नती करीता वर्ग-१ व वर्ग-२ करिता २९ जाने.२००४ रोजी कार्यरत असणारे उमेदवार यांची माहिती पुढील नमुन्यात १०० बिंदूत ठेवावी.

| बिंदू क्रमांक | बिंदूचा प्रवर्ग | अधिकारी कर्मचारी यांचे नांव | प्रत्यक्ष जात व जातीचा प्रवर्ग | भरती वर्ष | नियुक्तीचा दिनांक | जन्म तारीख | सेवानिवृत्ती दिनांक | जात वैधता तपासणी झाली आहे काय? | जात वैधता झाली असलेस तपासणीचा क्रमांक व दिनांक | जात वैधता प्रमाणपत्र देणाऱ्या समितीचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

२) संवर्गनिहाय मंजूर पदावर अनुशेषाचा गोषवारा असावा.

*मंजूर पदावरील अनुशेषाचा गोषवारा

| अ.क्र | संवर्ग | मंजुर पदे | भरलेली पदे | मंजुर पदावर आवश्यक आरक्षण | | प्रत्यक्ष कार्यरत/ भरलेली पदे | | मंजूर पदावरील अनुशेष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | | ७ (५-६) | ८ |
| | | | | अजा | | अजा | | | |
| | | | | अज | | अज | | | |
| | | | | विजा | | विजा अ | | | |
| | | | | भज ब | | भज ब | | | |
| | | | | भज क | | भज क | | | |
| | | | | भज ड | | भज ड | | | |
| | | | | इमाव | | इमाव | | | |
| | | | | विमाप्र | | विमाप्र | | | |
| | | | | खुला | | खुला | | | |
| | | | | एकूण | | एकूण | | | |

३) संवर्ग निहाय बिंदू प्रवर्गाचा गोषवारा असणे आवश्यक आहे. सदर प्रवर्गाचा गोषवारा खालीलप्रमाणे असावा.

* प्रवर्गाचा गोषवारा पुढीलप्रमाणे :

| अ.नं. | प्रवर्गाचे नाव | वापरलेले बिंदू क्रमांक व कार्यरत बिंदू क्रमांक (वापरलेल्या बिंदूना गोल करावे) | कार्यरत एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | | |
| २ | अनुसुचित जमाती | | |
| ३ | विमुक्त जाती (अ) | | |
| ४ | भटक्या जमाती (ब) | | |
| ५ | भटक्या जमाती (क) | | |
| ६ | भटक्या जमाती (ड) | | |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | | |
| ८ | इतर मागावसर्ग | | |
| ९ | खुला | | |
| | | एकूण | |

४) अ)शैक्षणिक संस्थाच्या बाबतीत प्राथमिक/माध्यमिक शाळा काढलेल्या अनुषेशाच्या गोषवाऱ्याखाली शिक्षण अधिकारी यांची प्राथमिकतपासणी केलेली स्वाक्षरी असावी.ब)माध्यमिक शाळांना संलग्न असलेली ज्युनिअर महाविद्यालये असतीलतर उपसंचालक, उच्चशिक्षण यांची स्वाक्षरी, क)विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालये वर्ग ४ ते वर्ग १ संवर्ग वर विद्यापीठ मागासवर्ग कक्ष यांची स्वाक्षरी, ड)आश्रमशाळा असलेसतर विशेष समाजकल्याण अधिकारी यांची प्राथमिकतपासणी अधिकारी म्हणून स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. ई)सहकार कार्यालये असतीलतर नियुक्ती प्राधिकारींनेउदा. D.D.R. यांचीप्रथम तापासणी अधिकारी म्हणून स्वाक्षरी असणे आवश्यक. संबंधित प्राथमिकतपासणी अधिकारी यांनी १०० बिंदू नामावलीच्या नमुन्यात कार्यालयाचे रोष्टर असलेतरच प्राथमिकतपासणी करुन अंतिम/मान्यतेकरीता या कार्यालयास पाठवावे.

५) रोष्टरवर प्राथमिकतपासणी अधिकारी यांची स्वाक्षरी घेताना सरळसेवा व पदोन्नतीचे काढलेले सर्व संवर्गाचे गोषवारे हे एक महिना अगोदर पर्यंतचे अद्यावत असावेत. तसेच पुढील वर्षभरात सेवानिवृत्त होणारे उमेदवार विचारात घ्यावेत.

६) सरळसेवा व पदोन्नती चेसर्व सवर्गाचे रोष्टर वेगवेगळे करुन आणणे आवश्यक आहे, एकत्रित आणू नये.

७) एकाच वेळी सर्व संवर्गाचे रोष्टर पडताळणी करीतासादर करण्यात यावे.

**वर नमूद केल्याप्रमाणे सर्व रोष्टर अद्यावत असावे.येताना रोष्टर सोबत खाली नमूद केलेली सर्व कागदपत्रे आणावीत.**

१) आपण या कार्यालयाने दिलेल्या तपासणी दिनांकाला उपस्थित राहताना शैक्षणिक संस्था असतीलतरसंस्थेने आपलेसंस्थेच्या अधिपत्याखाली असलेल्या प्राथमिक विभाग, माध्यमिक विभाग, उच्चमाध्यमिक विभाग, महाविद्यालय, तंत्रनिकेतन, आश्रमशाळा, (प्राथमिक/माध्यमिक/उच्चमाध्यमिक) , इंजिनिअरींग कॉलेज, डिप्लोमा कोर्स असलेले विद्यालय, वैद्यकिय महाविद्यालय, एम.बी.ए. इत्यादीसारखे सर्व अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना अनुदानित, कोणतेही आपल्या संस्थेच्या अधिपत्याखाली असेल त्या सर्वाचे १०० बिंदू नामावली घेवून उपस्थित रहावे.कोणत्याही एका शैक्षणिक प्रकाराची बिंदू नामावली तपासूण दिली जाणार नाही.कारणसंस्थेचे रोस्टरतपासणी केली जाते.

२) परिशिष्ठ- १ (प्रश्नावली) माहिती पूर्ण भरुन त्यावर सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी .

३) संवर्ग निहाय अंतिम सेवाजेष्ठता यादी सन १९९७ व चालू वर्षाची (प्रसिध्द अंतिमरित्या केलेल्या )

४) संवर्ग निहाय मंजूर पदसंख्येची संच मान्यता / आकृती बंध

५) सरळसेवा व पदोन्नती मधील सर्व संवर्गातील कार्यरत कर्मचारी यांच्या वैयक्तिक मान्यता असाव्यात.

६) सर्व संवर्गातील कार्यरत कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणप्रत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रतीसाक्षांकीत करुन आणाव्यात व त्याबाबतची खाली नमूद केल्याप्रमाणे यादीतयार करुन त्यावर शाखाप्रमुख यांची स्वाक्षरी ची यादी आणावी.

| अ.क्र. | उमदेवाराचे नाव | जात प्रवर्ग | जात प्रमाणपत्र असल्यास दिनांक नसल्यास नाही | जात वैधता प्रमाण पत्र असल्यास दिनांक नसल्यास नाही |
|---|---|---|---|---|
| | | | | |

७) पदोन्नती कोणत्या निम संवर्गातून दिली जातेत्याचीसाखळी द्यावी. (पदोन्नतीसाखळी)

८) पदोन्नती संदर्भात कार्यप्रणाली टिपणी .

९) यापूर्वी तपासणीमधील दर्शविलेल्या अनुशेष भरती केले बाबतचा अहवाल .

१०) शासन परिपत्रक दिनांक ६/५/०४ नुसार अंपगांसाठी ०.३ टक्के आरक्षणाकरिता गटनिहाय स्वंतत्र अद्यावत बिंदूनामावली ठेवण्यांत यावी.तसेच शासन निर्णय दिनांक १६/३/९९ नुसारसदर बिंदू नामावली तयार करतानासमांतर आरक्षण असलेसत्याप्रमाणेही नोंदी घ्याव्यात.उदा. अपंग-३%,प्रकल्पग्रस्त/भुकुंपग्रस्त- ५%,माजी सैनिक-१५%,खेळाडू ५% इ.

११) सोबत येताना आपल्या संस्था/कार्यालयातील सर्व संवर्गाचे कार्यरत असलेल्या कोणत्याही कर्मचा-यांबबत वरिष्ठ न्यायालयात न्यायालयीन प्रकरण चालू आहे अगर कसे? या बाबत कार्यालयीन प्रमुखांच्या स्वाक्षरीने लेखी पत्र आणावे असे काही प्रकरण नसलेसतसे लेखी पत्र आणावे.

१२) शासन निर्णय क्र.संकिर्ण १०९६/प्र.क्र.३०/का-२ दिनांक १/८/१९९७ नुसार महिलांसाठी सरळसेवा भरतीमध्यें ३०% आरक्षणानुसार खालीलतक्त्यातील माहिती रोष्टर रजिष्टरला ठेवावी.

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | जातीचा प्रवर्ग | प्रत्यक्ष कार्यरत असलेली महिलांची संख्या | मंजूर पदावर प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या महिलांची एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | अ.जा. | | |
| | | | अ.ज. | | |
| | | | विजाभज | | |
| | | | इमाव | | |
| | | | विमाप्र | | |
| | | | खुला | | |
| | | | एकूण | | |

टिपं : पडताळणीचे तारखेस येताना आपल्या कार्यालयाचे पत्र व सोबतची प्रश्नावली भरुन आणावी.

आयुक्त पुणे विभाग पुणे, करिता

प्रश्नावली

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नाव, संपुर्ण पत्ता, टेलीफोन नं | |
| २. | कार्यालय स्थापन झाल्याची तारीख | |
| ३. | कार्यालय प्रमुखाचा हुददा व नाव | |
| ४. | संस्था असल्यास अध्यक्ष व सचिवाचे नाव, संस्थेवर केंव्हापासून कार्यरत आहेत. | |
| ५. | शिक्षण संस्था असल्यास संसथा चालवित असलेल्या अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये, प्राथमिक व माध्यमिक शाळा किती आहेत. त्यांची नाववार/ गाववार यादी | |
| ६. | आपणास कोणकोणत्या पदावर सरळसेवा भरतीचे अधिकार प्राप्त आहेत. संवर्गाची नावे लिहावीत | |
| ७. | आपणास पदोन्नती देण्याचे अधिकार असल्यास कोणत्यापदावर पदोन्नती दिली जाते ती पदे | |
| ८. | आपण सरळसेवा व पदोन्नती ची बिंदु नामावली नोदंवही केंव्हापासून ठेवली आहे.? | |
| ९. | संस्था / कार्यालय ई यांनी मागासवर्ग कक्षाकडून बिंदू नामावली नोंदवहीची तपासणी केली आहे काय ? | |
| १०. | संस्था / कार्यालय यांनी, शासन निर्णयानुसार अंध/मुकबधीर/शारीरिक दृष्टया अपंग तसेच, माजी सैनिक / प्रकल्पग्रस्त / महिला यांची विशेष आरक्षणानुसार भरती केली आहे काय ? असल्यास कोणत्या प्रकारचे व कोणत्या पदांवर ते स्पष्ट लिहावे. | |
| ११. | संस्था वा कार्यालयाने शासनाच्या सूचनेनुसार, अंध,अपंग, मूकबधीर ई यांची स्वतंत्रबिंदूनामावली नोंदवही ठेवली आहे काय? ठेवली असल्यास मागासवर्ग कक्षाकडून प्रमाणित करुन घेतली आहे काय? | |
| १२. | कर्मचाऱ्यांची संवर्गवार सेवाजेष्ठता यादी दरवर्षी तयार करुन प्रसिध्द केली जाते काय? त्यावर कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी घेतली जाते काय? | |
| १३. | मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची जात प्रमाणपत्रे साक्षांकीत करुन त्यांच्या प्रती कार्यालयाने दप्तरी ठेवलेल्या आहेत काय? (रोष्टर पडताळणीचे दिनांक अखेर पर्यंतची कार्यरत असणारी मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची एकूण संख्या, त्यापैकी किती प्रमाणपत्रे प्राप्त ती संख्या लिहावी) | |

| | | |
|---|---|---|
| १४. | मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या जाती प्रमाणपत्रांच्या वैधतेची प्रमाणपत्रे प्राप्त करुन दप्तरी ठेवली आहेत काय? (रोष्टर पडताळणीचे दिनांक अखेर पर्यंतची कार्यरत असणारी मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची एकूण संख्या, त्यापैकी किती प्रमाणपत्रे प्राप्त ती संख्या लिहावी) | |
| १५. | सरळसेवा भरती करताना शासनाच्या विहीत पध्दतीनुसार कार्यवाही केली आहे काय? | |
| १६. | मुलाखतीचे वेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांना एक महिना आधी कळवून नियुक्ती केले जाते काय? तसा पत्रव्यवहार दाखवावा | |
| १७. | कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी पदोन्नती समितीची सभा घेण्यात येते काय? समितीवर मागासवर्गीय अधिकारी यांना समितीचे सदस्य म्हणून नियुक्त केले आहे काय? | |
| १८. | मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी पदोन्नती वा इतर कारणास्तव तक्रार सादर केली आहे काय? असल्यास त्यांची नावे व तक्रारीचे स्वरुप लिहावे. | |
| १९. | शासनाचे सूचनेनुसार १००० कर्मचारी असलेल्या कार्यालयात मागासवर्ग कक्ष स्थापन केला आहे काय? | |
| २०. | बिंदू नामावली नोंदवही नुसार अनुशेष भरती/पदोन्नती केली त्याबाबतचे विवरणपत्रांची माहिती कार्यालयाने सूचना फलकावर वेळोवेळी लावले आहे काय? (प्रती दाखवाव्यात) | |
| २१ | संस्था, कार्यालय इ.यांनी मागील तपासणीतील अनुशेष भरती आहे काय? नसल्यास कोणत्या पदाचा किती अनुशेष शिल्लक आहे, त्याचा तपशील द्यावा व शिल्लक राहणेची कारणे द्यावीत. | होय/नाही<br>शिल्लक अनुशेष<br>पद अनुशेष<br>१)<br>२) |
| २२. | अ.ज.प्रवर्गाच्या जात प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या/पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांबाबत माहिती. | |
| | पदाचे नांवः- | वर्ग ३ / वर्ग ४ |
| अ) | एकूण आवश्यक अज कर्मचारी संख्या? (१९९५ पूर्वी व १९९५ नंतर) | |
| ब) | एकूण कार्यरत अज कर्मचारी संख्या? (१९९५ पूर्वी व १९९५ नंतर) | |
| क) | पैकी १९९५ पूर्वीचे सेवेतील किती? व १९९५ नंतरचे किती? | |
| ड) | पैकी किती जातवैधता प्रमाणपत्र सादर झाले? (१९९५ पूर्वीचे व १९९५ नंतर) | |
| इ) | अवैध जातवैधता प्रमाणपत्र किती? १९९५ पूर्वीचे व १९९५ नंतर) | |
| फ) | अवैध जातप्रमाणपत्रावर काय कार्यवाही केली? | |

टीपः उपरोक्त माहिती पद निहाय देणेत यावी.